REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# महिला सक्षमीकरण

डॉ. मीता दिनकरराव कांबळे
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
भारतीय महाविद्यालय, अमरावती.

## प्रास्ताविक :—

मानवी जीवनाच्या सर्वांगिण विकासासाठी मानवी मूल्यांचा सहभाग अत्यंत आवश्यक आहे. जीवनाच्या सद्‌य परिस्थितीत स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय, ह्या मूल्यांची प्रतिष्ठापना करणे व त्यांची जोपासना करणे सर्वात महत्वाचे समजले जात आहे. आमच्या सामाजिक परिस्थिती मध्ये खरच ह्या मूल्यांचा समावेश झालेला आहे का? कारण समानतेच्या तत्वाचा विचार करीत असतांना असे लक्षात येते की समाजाचा ५०% वाटा ज्या स्त्रियांनी व्यापलेला आहे त्या स्त्रियांच्या बाबतीत हे समानतेचे मूल्य कितपत जोपासले जात?

स्त्रियांच्या सामातिक स्थितीकडे आपल्याला कानाडोळा करून चालणार नाही कारण समाजाची खरी प्रगती मोजायची असेल तर त्या समाजातील स्त्रियांच्या किती विकास झालेला आहे यावर ती अवलंबुन असते. नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते, देशाच्या एकंदर विकासासाठी शिक्षण व स्त्रियांचे समाजातील स्थान ह्यांना मुलभूत घटक मानलेले आहे स्त्री ही समाजाच्या विकासाचे मुख्य संसाधन आहे असे सांगून विकासातील स्त्रियांचे केंद्रवर्ती स्थान मान्य केलेले आहे. असे असतांना स्त्रियांची स्थिती काय आहे हे पाहण्याची गरज आहे.

## पार्श्वभूमी :—

भारतीय संस्कृतीला सारगर्भ आणि तेजोमय करण्यासाठी स्त्रियांचा सहभाग अत्यंत मोलाचा आहे. या संस्कृतीमध्ये एकीकडे ‘यत्र नार्यस्तु पुज्यन्ते रमन्ते तत्र देवता’ अशी देव्हाऱ्यातील स्थापना आणि दुसरीकडे ‘न स्त्री स्वाजंत्रम् अर्हति’ अशी अवहेलना ही आपणच करतो एकाच वेळी उमटणाऱ्या ह्या दोन परस्पर विराधी वृत्तीच्या आंदोलनात ती भरडून निघते आहे देवत्वाचे स्तोम आणि जनावरासारखी परवड ह्या दोन्हीही प्रतिमातून बाहेर पडून खऱ्या अर्थाने फक्त माणूस म्हणुन जगायचे आहे.

हजारो वर्षापासुन स्त्री पुरूषापेक्षा हीन व गौण लेखल्या जातेय. काही देशांत जसे चीनमध्ये स्त्रीला आत्माच नसतो अशी धारणा होती स्त्रियांची गणना भौतिक व उपभोगाच्या वस्तुंमध्ये केली जात असे १००—१२५ वर्षापुर्वी तेथे आपल्या पत्नीच्या हत्येबद्दल कुठल्याही पुरूषाला दंडित केल्या जात नसे कारण पत्नी ही त्याची संपदा होती. स्त्रीत्री छोटी नाजुक पावले स्त्री सौंदर्याची लक्षण मानली जात पावले ही कार्यशक्तीची प्रतीक आहेत पण सौंदर्याच्या नावाखाली लोखंडी बुटात अडकवुन, लहानपणापासुन करकचुन दोऱ्या आवळुन ती खच्चाी केली जात. जपानध्ये गीशा म्हणजे जवळजवळ रखेल ह्या या प्रथेला समाजमान्यता होती पुरूषाच्या पौरूषी सामर्थ्याचे ते निदर्शक होते आपल्याकडेही जनानखान्याच्या पडद्याच्या प्रथेखाली स्त्री कशी भरडली जातेय ते आपण आजही अनुभवतो आहोत.



गार्गी, मैत्रैही, लोपामुद्रा, कात्यायनी ह्या ब्रम्हवादिनी स्त्रियांनी आपल्या अनन्य साधारण व्यक्तीमत्वानी स्वत:चे नवे स्थान निर्माण केले. लगतच्या काळातही सावित्रीबाई फुले, आनंदीबाई जोशी, इंदीरा गांधी, किरण बेदी, कल्पना चावला, ह्या कर्तृत्ववान स्त्रियांधील प्रकाशमान तेजोवल्यांनी आपण स्तिमीत होऊन जातो पण हे केवळ मैलाचे दगड! मध्यल्या पायवाटेतील कच्चे दुवे मन सुन्न करून टाकतात साधारणत: १०० ते १२५ वर्षापलीकडे ओझरता दृष्टिक्षेप टाकला तरी मन गोठुन जाते. जन्मता किंवा नाकळत्या वयात होणारे बालविवाह, कोवळया वयातील बाळंतपणाची रांग, जरठविवाह व आठ नऊ वर्षाच्या अजाण व निष्पाप वयात नवऱ्याचं तोंडही न पाहता वैध्यव्य ओढवलं तर लाल आलवणात बोडख्या डोक्याने माजघरात तोंड लपवुन बसलेली बालविधवा तिला अख्खा जन्म बाहेर पास टाकायाचीही चोरी २४ तास मोलकरणीपेक्षाही जास्त राबून एका खरकटया पत्रावळीसारखी अपमानास्पद वागणूक वाटयाला यायची व याहुन अमानुष प्रकार म्हणजे सतीप्रथा, जळणाऱ्या चितांमधुन किंचाळत बाहेर येऊ पाहणाऱ्या स्त्रियांना काठीने पुन्हा चितेवर ढकलण्याचे अमानवी रानटी प्रकारही सर्रास रूढ होते छोटया छोटया बालिकांचे 'अवघे पाऊणशे वयमान' म्हणवणाऱ्या म्हाताऱ्या खोडांशी लग्न लावत आणि ५/१० वर्षातच तिच्या नशिबी असे वैधव्याचे किंवा जळून मरण्याचे चटके बसत. पुनर्विवाहाचा तर प्रश्नच नाही पण रोज मरण्यापेक्षा चितेवर एकदाचे मरण बरे म्हणून सती जाणे स्त्रिया पसंत करीत हे ते भयाण समाज वास्तव होते.

## बदलचे समाज चित्र :—

सुदैवाने हा काळ आता बदलतोय 'रांधा वाढा, उष्टे काढा, शिवा टिपा मुले सांभाळा ह्या चूल मूल क्षेत्रातुन तिची सुटका होते आहे समाजसुधारकांनी जसे महर्षी धोंडो केशव कर्वे, फुले दाम्पत्य, डॉ. आंबेडकर, गांधीजी, राजाराम मोहन रॉय, आगरकर अशा अनेकांनी आपले आयुष्य ह्या चिखलातून बाहेर काढण्यासाठी पणाला लावले आणि भारंभार ओझ्याखाली दडपलेल्या स्त्रीला सुटकेचे दोन क्षण, सुखाचे दोन श्वास प्राप्त करून दिले. संपूर्ण जगातील स्त्रिया परिवर्तनाच्या एका वळणावर येऊन पोहोचल्या आहेत. कधी नव्हे ते स्वत:चा स्वतंत्र विचार करू लागल्या आहेत. स्वत:चे जीवन नरक बनविणाऱ्या प्रश्नांचे भान त्यांना येवू लागले आहे. प्रकृतीने आपण पुरूषांपेक्षा भिन्न असलो तरीही सृजनक्षमता, संवेदनशीलता, चिकाटी वात्सल्य, सर्वस्व पणाला लाऊन काम पूर्ण करण्याची जिद्द, नियोजन ह्या स्वत:मध्ये दडलेल्या सुप्त गुणांचा विकासकरून जीवन खऱ्या अर्थाने अर्थपुर्ण करण्यासाठी त्या आतूर झालेल्या आहेत ती आज जागृत होवुन हक्कांसाठी लढते आहे.

घटनेने, कायद्याने तिला बरेच स्वातंत्र्य बहाल केले जसे हिंदू विवाह कायदा, हिंदू वारसा हक्क, बालविवाह प्रतिबंधक कायदा, गर्भपाताचा हक्क, हुंडाविरोधी कायदा, पोटगी बद्दलची सोय असे अनेक कायदे तिच्या आधाराला आहे पण अशा कायद्याची सविस्तर माहिती व त्याचा सुयोग्य वापर बरेचदा होत नाही. शिवाय त्यातला अपुरेपणा, किचकटपणा हे ही कारण असुन खरा व लवकर न्याय मिळणे दुरापास्तच. पण केवळ कायद्याने समस्या सुटणार नाही कारण स्त्रिला स्वातंत्र्य देणारे हात समर्थ असण्यापेक्षा ते स्विकारणारे तिचे मन घट्ट व समर्थ असणे जास्त आवश्यक आहे. निग्रह, संयंम, समान हक्क उपभोगण्याची आकांक्षा सहज भावाने अंतर्यामी प्रगट होणे आवश्यक आहे. निव्वळ बाहेरच्या परिवर्तनाने ते साध्य होणार नाही.

स्त्रिला खऱ्या अर्थाने समर्थ बनायचे असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र खऱ्या अर्थाने मार्गदर्शनाचा दिपस्तंभ आहे.

## स्त्रीशिक्षणाचे महत्व :—

स्त्रिशिक्षणाचे महत्व आज आपण सर्वच जण जाणतो. स्त्रीशिक्षणाला ज्योतीबा—सावित्री बाई फुले यांनी मातीवर अक्षरे गिरवून ह्या चळवळीला गतीमान केले. आज स्त्री शिक्षण सर्वत्र सुलभ असले तरी यासाठी ह्या लोकांनी बहिष्कार, दगड, धोंडयांचा, चिखलाचा मारा सहन केला आहे. त्यांच्या अग्नी दिव्यामुळे शिक्षणाची संधी आपल्याला प्राप्त झाली आहे. यांची कृतज्ञ जाणिव सतत तेवत ठेवली पाहीजे

तसेच आपण घेत असलेले ज्ञान हे मोर पिसाऱ्या वरील अगणित डोळया प्रमाणे नुसतेच दिखाऊ व आंधळे नसावे तर खऱ्या ज्ञानचक्षूप्रमाणे वास्तवाचे डोळस भान त्याने प्राप्त व्हायला हवे.

संयुक्त राष्ट्र संघाच्या शैक्षणिक समितीच्या एका अहवालात म्हटले आहे की स्त्री शिक्षणामुळे शिशु संगोपन, कौटुंबिक स्वास्थ्य व राष्ट्राची भरभराट यावर लक्षणीय प्रभाव पडतो. हे तिच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीनेही महत्वाचे आहे. 'एक स्त्री सुशिक्षित झाली तर पुर्ण घर सुशिक्षित होते.' असे म्हणताना स्त्रिचा दृष्टिकोन संपुर्ण घराला सकारात्मक दिशा देणारा असतो हेच आपण मान्य करत असतो. खरी सुशिक्षित स्त्री मना पासुन प्रयत्न करते आपले घर उभे करण्याचा, सावरण्याचा व ते संपन्न करण्याचा. सुसंस्कृत स्त्री स्वत:चा आत्म सन्मान सदैव जपेल परंतु अंहकार वाढणार नाही याची काळजी घेईल. स्वत:च्या व्यक्तिमत्वाची गळचेपी होऊ देणार नाही पण आपले व्यक्तिस्वातंत्र्य घराच्या हिताला, विकासाला बाधक ठरणार नाही याबद्दल जागृत असेल.

समाज प्रवाहात स्त्रिया आणि मुलींचा उघड आणि मुक्त सहभाग तसेच भय व दडपण विरहीत संचार करू देणे हे प्रत्येक नागरिकाला सुशिक्षित करणे या लोकशाही तत्वाचा आदर करण्यासारखे आहे. मात्र तळागळातील स्त्री अजुनही शिक्षणापासुन वंचित आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार भारतात ४८% लोक निरक्षर आहेत. पुरूष साक्षरतेचे प्रमाण ६३.८६% व स्त्री साक्षरतेचे प्रमाण ३९.४२% इतके कमी आहे. याचे प्रमाण वाढणे अत्यंत गरजेचे आहे.

UNPFA (युनायटेड नेशन्स पाप्युलेशन फंडिंग एजन्सी) ने जगातील २०० विकसनशिल राष्ट्रामध्ये केलेल्या पाहणीचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

८ वी पर्यंत शिकलेली मुलगी

अ) उशिरा लग्न करते.

ब) लहान कुटुंबाला प्राधान्य देते.

क) आपल्याला हव्या तेवढयाच मुलांना जन्म देण्याची शक्यता वाढते.

ड) शिक्षित मुलींचे प्रमाण अधिक असलेल्या देशात बालमृत्युचे प्रमाण कमी आहे.

इ) आरोग्य विषयक सुविधांचा उपयोग करून घेतात.

ई) त्या नवीन विचांराकडे पाहतात. नविन तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याकडे कल दिसतो.

य) माध्यमिक शिक्षण घेतलेल्या मुलींचे उत्पन्न शिक्षित मुलीपेंक्षा दीडपट जास्त तर तंत्रशिक्षण घेतलेल्या मुलीचे उत्पन्न तिसपट जास्त असते.

र) शाळेतील शिक्षणाचे एक एक वर्ष तिच्या उत्पादनात १० ते १२ वाढ आणते.

ल) मुलीच्या शिक्षणातून त्यांना मिळणार सर्वात मोठा फायदा म्हणजे त्यांना स्वत्वाची आणि स्वयंमूल्याची जाणिव होते.

मुलीच्या शिक्षणाचे इतके फायदे असुनही मुली मुलांच्या तुलनेत शिक्षणापासुन वंचित का? याची सर्व्हेक्षणातून दिसून आलेली काही ठळक कारणे खालील प्रमाणे.

१) भारतीय समाजात मुलांची किंमत जास्त. तो वंशाचा दिवा, म्हातारपणाची काठी यामुळे मुलींच्या आरोग्याकडे, शिक्षणाकडे दुर्लक्ष.

२) शाळा गावापासुन दुर असल्यास मुलींच्या सुरक्षिततेची काळजी वाटते.

३) मुली ह्या परक्याचे धन, लग्न करून दिले की एकादाचे सुटलो ही पालकाची भावना त्यात शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले तरी चालेल.

४) मुली या घरकामात मदत, लहान भावंडाना साभाळतात, व्यवसायात मदत करतात त्यांना शिक्षणासाठी पाठवणे म्हणजे या सर्व बाबीत खंड या विविध कारणामुळे मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केल्या जाते शिक्षणाची असमानता मुलींच्या व्यक्तीमत्वविकासात एक अडसर बनलेली आहे हे मात्र निश्चित.

## स्त्रीचे समाजातील दुय्यम स्थान :—

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो च्या अहवालानुसार दर ६ मिनटाला एका स्त्रिला मारहाण होते. दर ५४ मिनिटाला एका स्त्रीवर बलात्कार होतो. दर २६ मिनिटांनी विनयभंगाची केस होते. दर १०२ मिनिटांनी एक हुंडाबळी होतो.

वरील आकडेवारी ही केवळ दाखल झालेल्या गुन्हांची आहे. पण प्रत्यक्षात झालेल्या गुन्हांची संख्या किती तरी अधिक आहे. कारण सामाजीक प्रतिष्ठा कायद्याचे अज्ञान व न्यायदानातील लागणारा विलंब ह्या मुळे गुन्हे नोंदविले जात नाहीत व गुन्हेगारी वाढतच जाते. आधुनिक अमिरीकेतील ६७% जोडप्यामध्ये स्त्रीला एकदा तरी मार खावाच लागतो.

समाजाची मानसिकता बदलणे फार महत्वाचे आहे. स्त्रियावरील अत्याचार हा वैयक्तिक प्रश्न नसुन सामाजिक प्रश्न बनलेला आहे. एका निरीक्षणाच्या निष्कर्षानुसार कुटुंबातील हिसाचाराचा मुलांच्या मनावर जबरदस्त परिणाम होतो. अभ्यासाअंती सिध्द झालेले आहे. की ज्यांच्या घरात स्त्रियांवर रोज अत्याचार होतो. त्या घरातील मुले हिंसाचाराला सरावतात गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळतात. मुले स्त्रिची अवहेलना कारणे हा हक्कच समजतात व मुलीनाही अत्याचार निमुटपणे सहन करण्याची सवय होते. स्त्रीला एकटीलाच ह्या अत्याचाराला प्रतिकार करून भागणार नाही तर पुरूषाची मानसिकताच बदलणे जरूरीचे झालेले आहे. स्त्री ही केवळ आपली पत्नीच नसुन ती आपली आई आपली बहीण किंवा आपली पोटची लेकही असते ती ह्या अन्यायात होरपळत असते. हा दृष्टिकोन समाजात केव्हा निर्माण होईल?

## स्त्री समोर उभे असलेले प्रश्न :—

**समाजातील स्त्रियांचे घटते प्रमाण :—** यापुढे समाजातील यक्षप्रश्न निर्माण करणारी परिस्थिती उभी राहू पाहते आहे. स्त्रिच्या समाजातील दुय्यम स्थानापायी तिचे अस्तित्वच नाकारले जात आहे ' एका या दो बस्स' या काळात मुलगा असणे ईतके आवश्यक झालेले आहे की गर्भजल तपासणी ही केवळ गर्भातील बाळ स्त्री आहे की पुरूष हे पाहण्यासाठी केली जाते आणि गर्भातील मुल स्त्रिलिंगी असेल तर गर्भपात करून घेण्याची संख्या ९९ % आहे. जर गर्भात मुलगा असेल तर गर्भपाताचे प्रमाण केवळ १% आहे. यावरून या प्रश्नांची भीषणता लक्षात येते. अशिक्षित ग्रामिण समाजात तर हे प्रमाण भीषण आहे. जुन्या काळी राजस्थानात नवजात मुलगी दुधात बुडवुन मारत असत, हे लक्षात आल्याने बाल हत्या प्रतिबंधक कायदा निर्माण झाला पण गर्भातच नष्ट होणाऱ्या ह्या कळयांचे काय? ह्याचे परिणामही दिसु लागते आहेत. स्त्रियांचे पुरूषांशी दर हजारी परिणामी ९२६ च ९२६ च राहिले आहे. आणि समाजातील स्वास्थाच्या व संतुलनाच्या दृष्टिने विचार करता घटत चाललेले हे प्रमाण घातक आहे. या प्रश्नाचा वेळीच विचार करण्याची नितांत गरज आहे.

## हुंडयाचा प्रश्न :—

आज समाजात स्त्रीने प्रत्येक क्षेत्रात प्रगती केलेली आहे. तरी सुध्दा लग्नाच्या बाजारात तिचे स्थान दुय्यमच आहे. एक शिक्षित मुलगीही हुंडयासारख्या प्रकाराला संमती देते तेव्हा ती फक्त साक्षर की सुशिक्षित हा प्रश्न उभा राहतो. बऱ्याचदा असे लक्षात येते की मुलींचे शिक्षण हे Carrier Oriented न राहता Marriage Oriented आहे. खुप मुली फक्त चांगला नवरा मिळवण्याकरिता शिकतात मी माझे आयुष्य बदलवु शकेल हा विश्वास नाही. त्यातुन विवाहासारख्या पवित्र नात्याचे रूपांतर व्यवहारात होते. लाखोंची बोली लागते आणि जेथे व्यवहार सुरू होतो तेथे प्रेम संपुष्टात येते. संपुर्ण आयुष्य ज्या प्रेमावर, विश्वासावर उभारायचे आहे तो पायच डळमळीत होतो. एक रूक्षता जीवनात निर्माण होते. आम्हाला काचेच्या शोभिवंत वस्तुप्रमाणे सुरक्षितता देणारा आमच्यापेक्षा श्रेष्ठ नवरा हवा आमचा चौकीदार म्हणुन त्याला हुंडा द्यायचा व हुंडाबळी ठरायचे. विवाहसंस्थेचा बाजार झालेला आहे. अशा विजोड विवाहांनी कुटुंबे आतून मोडकळीला येतात. पण स्त्रीला पुरूषांईतके स्वावलंबी व आत्मविश्वासाने जगण्याचे

वातावरण आम्ही निर्माण करणार नाही. स्त्रियांच्या सर्वात अधिक अपमान करणाऱ्या ह्या हुंडयाचा विरोध सर्वच स्तरातुन व्हायला हवा.

**बलात्काराची समस्या :—**

स्त्री आत्मविश्वासाने लढा द्यायला पुढे येते तेव्हा तिला खच्ची करण्याचा सर्वात घृणीत प्रकार म्हणजे बलात्कार १ वर्षाच्या मुलीचे लग्न होवु नये म्हणुन भंवरी देवी पुढे येते. तेव्हा तिला नामोहरम करण्यासाठी तिच्या प्रौढ वयाचा विचार न करता बलात्कार होतो व स्थानिक न्यायालय उच्चवर्णिय असा प्रकार करणर नाही असा निर्णय देते. तेव्हा साऱ्याच संवेदना गोठुन जातात. ईथे बलात्कारीत स्त्री कडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलवण्याची गरज आहे. बलात्कारी पुरूषाला समाजात कुठलेही स्थान असता कामा नये. पण स्त्री शरीरावर झालेला हा एक प्रकार स्त्रीला भ्रष्टच करू शकत नाही, अशी मानसिक जडणघडण निर्माण व्हावी व स्त्रीला समाजातून पुर्ण सहकार्याचे वातावरण मिळावे. आज तान्हुल्या मुलीपासुन जख्खड म्हातारी स्त्री ह्या अत्याचाराचा बळी ठरू शकते. ही उदाहरणे पाहिल्यास स्त्री कडे केवळ एक शरीर ह्या दृष्टिकोणात बघणारी संकुचित मानसिकता समुळ नष्ट करणारी नवी मूल्ये समाजात रूजणे अत्यावश्यक झाले आहे.

**ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रश्न :—**

आज समाजामध्ये शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील स्त्रियांना अतिशय शारीरिक, मानसिक कुचंबणेला तोंड द्यावे लागते. शिक्षणाचा अभाव व पारंवारिक समाज मानसिकतेमुळे अतिशय संघर्षपुर्ण व यातनामय जीवनाला सामोरे जावे लागते ती घरची 'लक्ष्मी' व आर्थिक कौटुंबिक, सामाजिक निर्णयाचे सर्व हक्क पुरूषांच्या हातात आज तळागळाच्या ग्रामीण स्त्रीचे जीवन पाहल्यास पाणी, इंधन, संडास ह्या तिच्या मूलभुत समस्या आहे. इतक्या प्राथमिक स्वरूपाचा साधनासाठी तिच्या आयुष्यातिल महत्वाचा वेळ निघुन जातो. पाण्यासारख्या मुलभुत गरजेसाठी दिवसा काठी ३ ते ४ तास सतत फिरावे लागते ह्या वरून तिच्या कष्टांची कल्पना येईल. पण एवढे कष्टही सार्थकी लागत नाही. ती पुरूषांच्या बरोबरीने किंवा जास्तच राबते पण तिच्या श्रमाची कुणालाही कदर नाही तिची जागा पायातल्या वाहणे जवळच.

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम यांनी प्रसिध्द केलेल्या मानव साधन अहवालात (HRD 1995) जगातील स्त्रियांनी केलेले घरगुती श्रम ११ ट्रिलियन डॉलर्स ( १ट्रिलियन = १०) व पुरूषांनी केलेले घरगुती कार्य ५ ट्रिलियन डॉलर्स असल्याचा अंदाज व्यक्त केलेला आहे. या अहवालाच्या मध्ये जर स्त्रीयांच्या कार्याचे योग्य मुल्यांकन झाल्यास बहुतांश समाजात स्त्रिया याच कुटुंबाच्या पोषणकर्त्या (Bread Winners) किंवा बरोबरीच्या पोषणकर्त्या तरी ठरतील कारण त्या पुरूषापेक्षा अधिक तास काम करतात. पण घराबाहेर जाऊन केलेल्या श्रमाला अधिक महत्व गेलेले असल्याने स्त्रियांच्या कष्टाचे योग्य मुल्यमापन होत नाही.

या शिवाय तिला भेडसवणारे महत्वाचे प्रश्न म्हणजे दारू, अंधश्रध्दा, आरोग्याच्या माहितीचा व सुविधांचा अभाव, स्वच्छतेबाबतचे अज्ञान इ.

दारू व दारूमुळे होणारी संसाराची वाताहत याचे प्रमाण अतिशय वाढलेले आहे. एका ग्रामीण क्षेत्रातील महिलेने काढलेले उद्‌गार अधिक बोलके आहे. ती म्हणते 'सरकारला दारूबंदी तरी करायला सांगा नाहीतर आमच्या वस्त्यांवर बॉम्ब टाकायला तरी सांगा' दारूमुळे तिचा संसार पुर्णपणे उध्वस्त झालेला आहे अज्ञान व अंधश्रध्दांमुळे बुवाबाजी—जादुटोणा यांत्रिक मांत्रिक यांचे प्रस्थ फार बोकाळलेले आहे. तिच्या अज्ञानाचा व अंधश्रध्दांचा गैरफायदा करून घेत तिचे आर्थिक, भावनिक व लैंगिक शोषण केले जाते. यांचा फार मोठा बळी ठरते तेव्हा खऱ्या अर्थाने या भागातीलच सुधारणेचा व्यापक कार्यक्रम राबवणे गरजेचे झाले आहे. स्त्रिया कुटुंबात हतबल असतात, असुरक्षित असतात, परावलंबी असतात, म्हणून त्या अधिक अंधश्रध्दा बनतात. हा मानसशास्त्राचा निष्कर्ष आहे. आरोग्य, शिक्षण, आहार या सर्वच बाबतीत स्त्रीही अजुनही दुर्लक्षित आहे. याशिवाय व्यक्तीगणिक वेगवेगळया कौटुंबिक सामाजिक आर्थिक समस्यांना तिला समोरे जावे लागत आहे.

**उपाययोजना :—**

**१) शिक्षण :—** स्त्रियांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टिने शिक्षण हा सर्वात मह्त्वाचा घटक आहे आपल्यातील प्रत्येकाने तळातळातील स्त्रियापर्यंत शिक्षणाची उर्जा प्रवाहित करायला हवी. शिक्षण अधिक सुगम करून ते व्यवसायाभिमुख च विज्ञाननिष्ट करणे आवश्यक आहे. नोकऱ्यांची उपलब्धता कमी असल्याने श्रम प्रतिष्ठेचा संस्कार रूजविणे जास्त महत्वाचे आहे. स्वयंरोजगाराचे योग्य कौशल्य विकसित करणे व रोजगाराची व निर्मितीची क्षमता वाढविणे या दृष्टिकोनातुन शिक्षणाचे अभ्यासक्रम निर्माण करावे लागतील समाजातिल तिचे स्थान बळकट होण्यासाठी शिक्षणाने योग्य जीवनदृष्टी देणे गरजेचे आहे. विज्ञाननिष्ठ आधुनिकतेतील प्रखरता, संवेदनातील ताजेपण, सर्वस्पर्शी विवेकसंपन्न जीवन दृष्टिचा स्वीकार होणे गरजेचे आहे. मोह, भिती, स्वार्थ, व्देष यापासुन मुक्ती अशी जीवन प्रणाली आणि बाह्य शक्तीचे दडपण झुगारावयाचे नीतीधैर्य निर्माण करावे लागते आजचे युग हे नवनविन आव्हानाचे आहे. विशेषत: संगणकाचे आहे. तेव्हा आज जो संगणकाची भाषा जानेल तोच खरा साक्षर ही साक्षरतेची नवी परिभाषा आहे. आणि येणारे संगण्कयुग हे महिलांचे आहे असे या क्षेत्रातील तज्ञांचे मत आहे. संगणक तज्ञ पदमश्री डॉ. विजय भटकर यांच्या मते 'जी स्त्री सुंदर कलात्मक रांगोळी काढते, कोंड्याचा मांडा करून सुरेख स्वयंपाक बनवते तिला संगणक हाताळणे अगदी सोपे आहे'. संयम सहनशिलता व सृजनत्व हे स्त्रियांचे नैसर्गिक गुण आहे. ते संगणक युगाला अत्यंत आवश्यक आहेत त्या गुणांची क्षमता वाढवुन तिने स्वत:च्या विकासाच्या नव्या दिशा शोधल्या पाहिजेत.

**२) अर्थार्जन क्षमतेचा विकास :—** प्रत्येक स्त्रीने अर्थार्जनाची क्षमता स्वयंरोजगारातुन विकसित केली तर ती कुठल्याही परिस्थितीत अन्यायाचा प्रतिकार करू शकते.

**३) संघटन :—** स्त्रीशिक्षण प्रत्येक स्त्रीपर्यंत पोहचणे जसे या स्त्रीसामर्थ्य संपन्नतेचा पाया आहे. तसेच स्त्रियांनी सर्व स्तरात संघटीत होणे आवश्यक आहे यासाठी ''सेवा'' (Self employed Women's association) अहमदाबाद या संघटनेतील स्त्रीचे उद्‌गार बोलके आहेत ती म्हणजे मला आता कशाचीच भिती नाही वा कुठलीही चिंता नाही कारण सेवा संस्थेच्या हजारो महिला माझ्या पाठीशी आहेत संघटीत प्रयत्न करून स्त्रिया स्वाभिमानाने जगु शकतात याचे हे उदाहरण आहे. संघटनामध्ये प्रत्येक स्त्रीच्या प्रगतीला पुरक व समस्यांची उकल करणारे वातावरण निर्माण होईल हे प्रमुख ध्येय असावे. स्त्रीयांच्या मुलभूत समस्यांची जाण ठेवली तरी कार्य पुष्कळ पुढे जाईल स्त्रीजागृतीचे कार्य विविध कार्यक्रम, उपक्रम व प्रसार माध्यमाच्या जागरूक असलेल्या शैक्षणिक संस्थाच्या मदतीने केले जावे या सांघिक बळातून प्राथमिक आरोग्याची मदत, स्वच्छतेचे संस्कार, स्वंयरोजगाराच्या संधी गरजू स्त्रीयापर्यंत पोहचवण्यात याव्या.

**४) 'स्व' त्वाची जाणिव विकसित करणे :—** एक फ्रेंच लेखिका म्हणते स्त्री ही स्त्री म्हणुन जन्माला येत नाही तर ती संस्काराने स्त्री बनते. म्हणजे आज दुय्यमतेची जी भावना आहे तो निव्वळ खोटा संस्कार आहे. कारण स्त्री शारिरिक दृष्टया पुरूषापेक्षा वेगळी असेल पण कमी निश्चितच नाही. उलट वेगवेगळया परिस्थितीमध्ये तग धरून राहण्याची विलक्षण चिकाटी व नैसर्गिक प्रतिकारक्षमता तिच्यात आहे तिच्यामध्ये जी दुर्बलता निर्माण झालेली आहे तो मनावर झालेल्या कमकुवत संस्कारांचा परिपाक आहे योगा, व्यायामख नि:शस्त्र कौशल्ये जसे ज्युदो, कराटे यासारख्यांचा नियमित अभ्यास करून ती सहज स्वत:चे संरक्षण करू शकते. शारिरीक क्षमतेबरोबर स्वस्थ मानसिकतेची कास धरणे ही आवश्यक आहे मनाभोवती साचलेली कालबाह्य रूढी परंपरांची शेवाळे झटकून स्वस्थ न्यायपुर्ण जीवनाची तिने संकल्पना ईथे स्पष्ट होणे आवश्यक आहे. निर्बधांचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य नव्हे तर स्वत:तील क्षमता ओळखुन त्यांच्या विकासाला पुरक असे वातावरण व न्याय समाज व्यवस्था निमिर्ती म्हणजे स्वातंत्र्य होय. ह्या शैक्षणिक सांघिक सामाजिक चळवळीतुन एक सुसंस्कृत व्यक्तिमत्वसंपन्न स्त्री घडवायची आहे. ह्या सुसंस्कृत समंजसपणातुन येणाऱ्या पिढयांवर एक नवा संस्कार घडवणारी असेल एक खरी जागृत स्त्री स्वत:वर अन्याय होऊ नये म्हणुन जेवढी जागरूक असेल तेवढीच दुसऱ्यावर अन्याय होऊ नये यासाठी ही दक्षता घेईल

**५) नव्या काळाची आव्हाने :—** येणाऱ्या काळाचे आव्हाने कोणते तेही आपण नीटपणे तपासले पाहीजे. आपल्या संस्कृतीचा विचार करता एक गोष्ट महत्वाची आहे, की जागतीकीकरणाच्या ह्या रेटयात प्रगत संस्कृतीची मुल्ये ही अप्रगत संस्कृतीवर वेगाने आदळतात. सध्याची स्थिती तशीच आहे नवे स्वैराचाराकडे झुकणारे M. TV Cuture निर्माण होते आहे. आणि ह्या संक्रमणाच्या युगात स्त्री तत्व ही फार मोठे आशास्थान आहे. कारण निसर्गाने तिच्यावर विश्वासाने फार मोठी जबाबदारी सोपविली आहे नवनिर्मितीची, सृजनाची केवळ तीच नवजीवन निर्माण करू शकते. तसेच नविन युग, नविन पिढी घडविण्याचे सामर्थ्य तिच्यातच आहे. तसेच ह्या युगात आत्मभान जपणारी व समाजाला अंतमुर्ख करून उन्नतीच्या वाटेने नेण्याची प्रेरणा स्त्रीतच आहे. हे मान्य केले पाहीजे येणारी खरी आधुनिक स्त्री शरीर ही माझी नियती आहे. असे म्हणणार नाही पण या शरीराच्या जोरावर ह्या जगाला जिंकण्याचा दिखाऊ व फसवा प्रयत्नही करणार नाही. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार अशा चुकीच्या संकल्पना उराशी बाळगल्या जातात. तेव्हा अशी संस्कृती फोफावते पण आपल्या कडे या गोष्टींचा प्रतिकार व्हायलाच हवा कारण मानवि अस्तितवाची प्रतिष्ठा स्वतंत्रतेत आहे. आणि खऱ्या वृत्तीचा माणुस समाज सन्मुखतेतुन निर्माण झालेला नियम स्वताहुन स्विकारत असतो. स्त्रिपुरूष समानता म्हणजे स्त्रिला पुरूषांसारखे बनायचे नाही तर आपल्यातील क्षमतांचा परिपुर्ण विकास घडवुन आणायचा आहे. ह्या क्षमतांचा योग्य विकास तर स्त्रियांनी घडवुन आणला तर त्या कैक पटीने श्रेष्ठ बनतील व येणारे युग स्त्रियांचेच असेल असे असा विश्वास शास्त्रज्ञांनाही वाटतो आहे.

**६) समारोप :—** स्त्रीवादाच्या ह्या चळवळीत कैक अडथळे असतील अंधार पसरलेला दिसेल पण गडद अंधार असतो. तेव्हाच ती नविन पहाटेची सुरूवात असते हे आपण जाणले पाहीजे. १०० वर्षापुर्वीचा काळ पहिला तर आपण प्रगती पथावर आहोत हे दिसेल जुन्या काळी कचरत बाहेर पडणारी पावले आत्मविश्वासाने मार्गक्रमण करीत आहेत. कुठलाही समाजसुधारणेचा विचार सुरूवातिला बिकट वाटला तरी नवी संस्कारीत पिढी त्याचा मनमोकळेपणे स्विकार करते 'प्रयत्ने वाळुचे कण रगडता तेलही गळे' म्हणतात तसेच या वाटेवरचे आमचे भगीरथ प्रयत्न यशोगंगेला खेचुन आणणारे आहेत. या वाटेवर अनेक आव्हाने असतील, अनेक त्रुटी निदर्शनास येतील पण त्यांना सुधारत नवनवी क्षितीजे धुंडाळत समोर जावे लागेल. 'मुकी बिचारी कुणीही हाका, अशी मेंढरे बनु नका' ही परिस्थितीशरणता २१ व्या शतकात आम्हाला शोभणार नाही. स्त्रीत्वाच्या नियोजन बध्द व संतुलीत विकास साधण्यासाठी कटीबध्द व्हावे लागले प्रवाहपतीत म्हणुन जगण्यापेक्षा त्या प्रवाहाला आमच्या समृध्दीच्या वाटेकडे वळवु. मानसिक, सामाजिक, आर्थिक अस्थैर्याच्या जगात समतोल व्यक्तिमत्व उभारायचे आहे. जे आपल्या आयुष्याला अनिष्ट वळण लागु न देता विवेकसंपन्न बनवावे लागेल. हा दुर्दम्य आशावाद उराशी बाळगुन भारतीय स्त्री ह्या काळाच्या उदरात आपल्या प्रकाशाचा एक किरण शोधण्यास सज्ज झाली आहे. तिची प्रार्थना आहे 'ज्ञानेशाचे पसायदान' जे सर्व विश्वाच्या मंगलाची आराधना करीत आहे. हाच सकारात्मक आत्मविश्वासपुर्ण दृष्टीकोन स्त्रीला खऱ्या अर्थाने संपन्न व समृध्द करून जाईल.

## संदर्भ


१) संयुक्त राष्ट्रसंघाच्या शैक्षणिक समितीचा अहवाल.
२) (UNPFA युनायटेड नेशन्य पाप्युलेशन फंडिग एजन्सी) चा निष्कर्ष.
३) नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो चा अहवाल.
४) अमरावती विभाग — गुन्हेगारी रेकॉर्ड.
५) संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाचा मानव साधन अहवाल (HDR 1995).
६) माहिलांच्या सबलिकरणासाठी परिवर्तन — डॉ. सीमा साखरे.